**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

**-: प्रेस नोट :-** **दिनांक - २६/०७/२०२४**

**मागील २४ तासांत मुंबईचे विविध परिसर छापे टाकत ४ कोटी २४ लाख रूपये किंमतीचे एकूण ८ किलो वजनाचा चरस व १५० ग्रॅम वजनाचा एम.डी.ड्रग्ज जप्त.**

| | |
|---|---|
| **अं.प.वि., गु.र. क्र. व कलम** | १) गु.र.क्र.३९/२०२४, कलम ८ (क) सह २२ (ब) एन.डी.पी.एस.कायदा १९८५ **(आ.मैदान युनिट)**<br>२) गु.र.क्र.४०/२०२४, कलम ८ (क) सह २२ (क) एन.डी.पी.एस. कायदा १९८५ **(घाटकोपर युनिट)**<br>३) गु.र.क्र.४१/२०२४, कलम ८ (क) सह २० (क) एन.डी.पी.एस. कायदा १९८५ **(आ. मैदान युनिट)**<br>४) गु.र.क्र.४२/२०२४, कलम ८ (क) सह २२ (ब) एन.डी.पी.एस. कायदा १९८५ **(कांदिवली युनिट)** |
| **दाखल दिनांक** | दिनांक २५/०७/२०२४, व २६/०७/२०२४ |
| **गुन्हयांचे घटनास्थळ** | १) माझगांव, मुंबई २) मानखुर्द पुर्व, मुंबई<br>३) शिवडी पुर्व, मुंबई ४) दहिसर पुर्व, मुंबई |
| **आरोपी संख्या** | एकूण ०४ आरोपी. |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | १) एकुण १५० ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम.डी.) अं.किं. रूपये २६,००,०००/-<br>२) अंदाजे ७ किलो ९५४ ग्रॅम वजनाचा चरस किं.अं.रूपये ३.९८ कोटी रूपये/-<br>**असा एकूण ८ किलो १०४ ग्रॅम किं.अं. रूपये ४ कोटी, २४ लाख रूपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त.** |

(१) **शिवडी पुर्व, मुंबई परिसरातून ७ किलो ९५४ ग्रॅम चरस जप्त -**

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे **आझाद मैदान युनिटचे** पथकाने दिनांक २५/०७/२०२४ रोजी शिवडी, पुर्व या परिसरात अंमली पदार्थ विरोधी कारवाई दरम्यान एका इसमास अटक केले. त्यांचे ताब्यातून **७ किलो ९५४ ग्रॅम वजनाचा 'चरस' एकुण किं.अं. रुपये ३.९८ कोटी रूपये** किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. नमूद आरोपीस रिमांडकामी मा.न्यायालयात हजर करीत आहोत. नमूद गुन्हयाचा पुढील तपास आझाद मैदान युनिटचे पोउनि सागर घाडगे हे करत आहेत.

**(२) मानखुर्द पुर्व परिसरातून ९७ ग्रॅम वजनाचा एम.डी. जप्त -**

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे घाटकोपर युनिटने दिनांक २५/०७/२०२४ रोजी मानखुर्द पुर्व, मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे विक्री करीता आणलेला एम.डी. हा अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या तस्करांस ताब्यात घेतले. त्यांचे ताब्यातून एकूण ९७ ग्रॅम वजनाचा एम.डी. किंमत अंदाजे रूपये १९ लाख रूपये किंमतीचा एम.डी. हा अंमली पदार्थ मिळून आल्याने, त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. नमूद गुन्हयाचा पुढील तपास घाटकोपर युनिटचे पो.नि. दिगंबर पाटील हे करत आहेत.

**(३) दहिसर पुर्व परिसरातून ३८ ग्रॅम वजनाचा एम.डी. जप्त -**

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे कांदिवली युनिटने दिनांक २५/०७/२०२४ रोजी दहिसर पुर्व, मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे विक्री करीता आणलेला एम.डी. हा अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या एका तस्करांस ताब्यात घेतले. त्यांचे ताब्यातून एकूण ३८ ग्रॅम वजनाचा एम.डी. किंमत एकूण ३.७६ लाख रूपये किंमतीचा अंमली पदार्थ मिळून आल्याने, नमूद इसमांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयांचा पुढील तपास कांदिवली युनिटचे सपोनि उल्हास खोलम हे करत आहेत.

**(४) माझगांव, मुंबई परिसरातून १५ ग्रॅम वजनाचा एम.डी. जप्त -**

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे आझाद मैदान युनिटने दिनांक २५/०७/२०२४ रोजी माझगांव मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे विक्री करीता आणलेला एम.डी. हा अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या एका तस्करांस ताब्यात घेतले. त्यांचे ताब्यातून एकूण १५ ग्रॅम वजनाचा एम.डी. किंमत एकूण ३ लाख रूपये किंमतीचा अंमली पदार्थ मिळून आल्याने, नमूद इसमांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयांचा पुढील तपास सपोनि अमोल गवळी हे करत आहेत.

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. शाम घुगे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. राजेंद्र शिरतोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, आझाद मैदान युनिटचे प्रभारी पो.नि. श्री. राजेंद्र दहिफळे, घाटकोपर युनिटचे प्रभारी पो.नि. श्री. भगवान बेले, कांदिवली युनिटचे प्रभारी पो.नि. श्री.वैभव धुमाळ यांचे नेतृत्वाखाली करण्यात आली आहे.

------oooo------